जिल्हा उद्योग केंद्र,नांदेड.

महाराष्ट्र शासन

**कार्यालय महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड.**

उद्योग भवन, पहिला मजला, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड- 431602

(02462) (250056) Email: didic.nanded@maharashtra.gov.in

जा.क्र.जिउकेनां/जिनिस/2023/ दिनांक :

## महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषदेतंर्गत जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दि. 29.02.2024 इतिवृत्त

महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषदेतंर्गत जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दि. 29.02.2024 रोजी सायं. 6.30 वा. मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे संपन्न झाली. सभेस सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते. श्री. अमोल इंगळे, महाव्यवस्थापक यांनी उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत करुन जिल्हयात, चालू वर्ष 2023-2024 मध्ये 80% निर्यात वृध्दी करण्याचे लक्ष्य ठरविले आहे असे सांगितले. मा. विकास आयुक्त (उद्योग) यांच्या दि. 3.8.2023 रोजीच्या अर्धशासकीय पत्रातील 10 कलमी कार्यक्रमातील कृतीमुद्दयानुसार, मा. जिल्हाधिकारी, परिषदेतील सदस्य व जिल्हयातील निर्यातदार उद्योजकांशी, अमलबजावणीसाठी चर्चा करण्यात आली.

- मा. अध्यक्षांनी नांदेड जिल्हयात होत असलेल्या निर्यातीबाबत प्रगतीचा आढावा घेत, निर्यातवृध्दी व नवीन निर्यातक्षम उत्पादने शोधावे असे मा. अध्यक्षांनी निर्देशित केले.
- जिल्हा पातळीवर निर्यातदारांच्या अडी-अडचणी समजून घेण्यासाठी दि. 6.12.2023 रोजी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत कार्यशाळा संपन्न झाल्याचे महाव्यवस्थापक यांनी सांगितले.
- मा. अध्यक्षांच्या निर्देशानुसार, "BRAND MAHARASHTRA" प्रमोट करण्यासाठी District Export Summit तसेच District Investor Summit चे आयोजन पुढील महिन्यात करण्यात येणार असल्याचे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड यांनी सांगितले.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर शेवटी उपस्थितांचे आभार व्यक्त करुन सभा संपन्न झाली.

महाव्यवस्थापक,<br>
जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड.<br>
तथा सदस्य सचिव<br>
जिल्हा निर्यात प्रचालन समिती,नांदेड.

मा. जिल्हाधिकारी,<br>
नांदेड. तथा अध्यक्ष<br>
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नांदेड.

Scanned with OKEN Scanner